क्रमांक : मुंमप्रविप्रा/बैठक/६७.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, प्लॉट क्र. सी-१४ व १५.
"ई" ब्लॉक, वांद्रे[पूर्व], मुंबई-४०० ०५१.

दिनांक : १८ डिसेंबर, १९९२.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दि. २५ नोव्हेंबर, १९९२ रोजी झालेल्या ६७ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

२. सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत काही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्यात ही विनंती.

[ श्र. वि. आसगांवकर ]
सचिव,
कार्यकारी समिती.

प्रति :

सर्व सदस्य.

निमंत्रित :

शासनाचे सचिव[२]
नगर विकास विभाग
मंत्रालय.

प्रत अग्रेषित :

विधी सल्लागार, मुं. म. प्र. वि. प्राधिकरण,
प्राधिकरणाचे अधिकारी.

138

No. BMRDA/MTG/67.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Plot Nos. C-14 & C-15,
Bandra-Kurla Complex,
Bandra (East),
Bombay-400 051.

Date : 13th December, 1992.

The minutes of the 67th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 25th November, 1992 are enclosed.

Members are requested kindly to intimate their objections, if any.

( S. V. ASGAONKAR )
SECRETARY,
EXECUTIVE COMMITTEE.

To :

All Members.

INVITEE :

The Secretary (II) to the Government of Maharashtra, Urban Development Department, Mantralaya.

Copy to :-

The Legal Adviser, B.M.R.D.A.

The Officers of the B.M.R.D.A.

-.-.-.-.-.-.-.-.-

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या ६७व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : २५ नोव्हेंबर, १९९२ [बुधवार]

वेळ : सकाळी १०-३० वाजता

स्थळ : मा. नगर विकास मंत्री यांच्या कार्यालयातील समिती कक्ष [रु. नं. ३१३] तिसरा मजला, मंत्रालय.

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| श्री. जवाहरलाल दर्डा<br>नगर विकास मंत्री | – | अध्यक्ष |
| प्रा. जावेद खान<br>गृहनिर्माण मंत्री | – | सदस्य |
| श्री. रणजित देशमुख,<br>नगर विकास राज्यमंत्री | – | सदस्य |
| श्री. रा. ता. कदम,<br>अध्यक्ष, स्थायी समिती,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | – | सदस्य |
| श्री. रा. रा. सिंह,<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | – | सदस्य |
| श्री. सुभाष मयेकर,<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | – | सदस्य |
| श्री. प्रभाकर ना. धारकर,<br>विधान परिषद सदस्य | – | सदस्य |
| श्री. डि. टी. जोसेफ,<br>शासनाचे सचिव [१]<br>नगर विकास विभाग | – | सदस्य |
| श्री. नविन कुमार<br>शासनाचे सचिव,<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | – | सदस्य |
| श्री. पी. सुब्रहमण्यम,<br>महानगर आयुक्त | – | सदस्य-सचिव |

निमंत्रित

श्री. गो. बा. पिंगुळकर,
शासनाचे सचिव [२],
नगर विकास विभाग

नगर विकास मंत्री म्हणून नेमणूक झाल्यावर श्री. जवाहरलाल दर्डा हे प्रथमच प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून बैठकीत उपस्थित राहीले त्याबद्दल सदस्यांनी त्यांचे सभेच्या प्रारंभी सौहार्दपूर्वक स्वागत केले.

त्यानंतर अध्यक्षांनी नगर विकास राज्यमंत्री श्री. रणजित देशमुख यांचे प्राधिकरणाचे नवीन सदस्य म्हणून मन:पूर्वक स्वागत केले.

त्यानंतर माजी नगर विकास मंत्री श्री. वसंत चव्हाण यांनी प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून, आणि माजी नगर विकास राज्यमंत्री श्री. मदन बाफना यांनी प्राधिकरणाचे सदस्य म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा अध्यक्षांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

कार्यसूचीवरील बाबी त्यानंतर विचारार्थ घेण्यात आल्या.

बाब क्र. १ : प्राधिकरणाच्या मागील [६६व्या] बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.

कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

बाब क्र. २ : प्राधिकरणाच्या मागील [६६व्या] बैठकीच्या कार्यवृत्तांवर केलेली कार्यवाही.

वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "ए" ब्लॉकमध्ये वांद्रे रेक्लमेशनच्या सीटीएस क्र. ए-७९१ वरील इमारतीला लीलावती कीर्तिलाल मेडिकल ट्रस्टकरिता [६६व्या बैठकीची बाब क्र. १२] अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक देण्यासंबंधीच्या बाबीची चर्चा केल्यानंतर मागील सभेच्या कार्यवृत्तावर केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची प्राधिकरणाने नोंद घेतली.

बाब क्र. ३ : वडाळा भारवाहक तळाचा विकास - भारवाहक तळ वडाळा, टप्पा-२ मधील पायाभूत बांधकामांच्या प्राथमिक अंदाजपत्रकास मान्यता

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव संमत केला व पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. ५४४ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, प्रस्तावित केल्याप्रमाणे प्राधिकरण याव्दारे, वडाळा भारवाहक तळाच्या टप्पा-२ मधील पायाभूत बांधकामासाठी बाब टिप्पणीच्या जोडपत्रांत दिलेल्या तपशीलाप्रमाणे रु. २७९० लाख इतक्या प्राथमिक अंदाजपत्रकास प्रशासनिक मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, वडाळा भारवाहक तळाच्या टप्पा-२ मधील पायाभूत बांधकामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही करण्यास आणि या बाबीवर आवश्यक होईल तो खर्च करण्यास महानगर आयुक्तांस याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>बाब क्र. ४ :</u> वडाळा ट्रक टर्मिनलच्या फेज-१ मधील उरलेले भूखंड मुंबई माल वाहतूक संस्था व महाराष्ट्र राज्य ट्रक, टेम्पो, टॅन्कर्स बस वाहतूक महासंघ यांना वितरण..

चर्चेनंतर या बाबीचा आणखी विचार करण्यासाठी ती लांबणीवर टाकण्यात आली.

<u>बाब क्र. ५ :</u> वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील जमीन नाबार्डला नेमून देणे.

ही बाब प्राधिकरणापुढे ठेवताना महानगर आयुक्त यांनी बैठकीत असे सांगितले की, प्राधिकरणाने दि. ११ ऑगस्ट, १९९२ रोजीच्या आपल्या ६५ व्या बैठकीत, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील दोन भूखंड, दोन वित्तीय संस्थांना म्हणजे भारतीय औद्योगिक पत व गुंतवणुक महामंडळ [आयसीआयसीआय] आणि राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बॅन्क [नाबार्ड] यांना अनुक्रमे ठराव क्र. ५२८ व ४२९ अन्वये नेमून देण्यात आले होते. आयसी-आयसीआयला सुमारे ३०.००० चौ. मी. व नाबार्डला सुमारे २३,२३५ चौ. मी. जमीन नेमून दिली होती. नाबार्डने देकार स्वीकारला आणि ९२९३ चौ. मी. अतिरिक्त भूखंड नेमून देण्याचीही विनंती केली आहे. त्यामुळे त्यांचा भूखंड एकूण ३२,५२८ चौ. मी. इतका होणार होता. आयसीआयसीआयला ३०.००० चौ. मी. भूखंड नेमून देण्यात आला आहे हे विचारात घेऊन नाबार्डला सुद्धा सुमारे ३०,००० चौ. मी. चा भूखंड नेमून देण्यात यावा असे प्राधिकरणाने ठरविले व त्याप्रमाणे पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ५४५ :</u>

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम [२] आणि मुंबई महानगर विकास प्राधिकरण [जमिनींची विल्हेवाट] विनियम, १९७७ चा विनियम क्र. ४ [तीन] [यापुढे याचा "उक्त विनियम" म्हणून निर्देश केला आहे] आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याव्दारे, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील अतिरिक्त जमीन नाबार्डला, उक्त विनियमांच्या नमुना "डी" मधील

करार करून दिल्याच्या तारखेपासून ८० वर्षाच्या भाडेपट्टयाने पुढील अटी व शर्तीवर नेमून देण्याचा प्रस्ताव मान्य करीत आहे. यामुळे सुमारे ६७६५ चौ. मी. अतिरिक्त बांधलेले क्षेत्र धरून नेमून दिलेल्या [पूर्वीच्या व अतिरिक्त] भूखंडाचे संपूर्ण क्षेत्र सुमारे ३०,००० चौ. मी. होईल. :-

[१] भाडे अधिमूल्य प्रति चटईक्षेत्र निर्देशाक चौ. मी. ला रु. १५,०००/- इतके राहील.

[२] संदर्भाधीन अतिरिक्त जमिनीच्या बाबतीत, उक्त विनियमांचा विनियम क्र. ९ शिथिल करून नाबार्ड भाडे अधिमूल्य खालील रीतीने प्रदान करील. :-

[अ] ४० टक्के भाडे अधिमूल्य देकार स्विकारल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत,

[ब] ३५ टक्के भाडे अधिमूल्य देकार स्विकारल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत, आणि

[क] उरलेले २५ टक्के भाडे अधिमूल्य वरील [ब] मध्ये नमूद केलेल्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आंत.

[३] हा देकार "उक्त विनियमांच्या"अधीन आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, महानगर आयुक्तांना हा ठराव कार्यान्वित करण्यास आणि आवश्यक असेल त्याप्रमाणे भाडेपट्टा कराराच्या नमुना "डी" मध्ये व भाडेपट्टा विलेखाच्या नमुना "ई" मध्ये योग्य ते बदल करण्यास याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>बाब क्र. ६ :</u> अधिकारयुक्त हिशेब तपासणीच्या संघटनेला वांद्रे-कुर्ला समूहात कार्यालयाची इमारत बांधण्याकरिता ५०००/- चौ. मी. जागा "जी" ब्लॉकमध्ये देण्याबाबत..

या बाबीवर विचारविमर्श करण्याचे पुन्हा लांबणीवर टाकण्यात आले.

<u>बाब क्र. ७ :</u> मे. मुकंद आयर्न अॅन्ड स्टील वर्क्स लिमिटेड [आता नवीन धारण केलेले नांव मुकंद लिमिटेड]च्या पवई येथील जमिनीबाबत शासनाचा नगर विकास विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व मे. मुकंद लि. यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार करण्यास संमती देणे..

या बाबीवर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

बाब क्र.८ : वांद्रे-कुर्ला संकुलातील पाटखोदाई प्रकल्पाचा वस्तुस्थिती अहवाल.

वांद्रे-कुर्ला संकुलातील पाटखोदाई प्रकल्पाचा तपशीलवार स्थिती अहवाल असलेली टिप्पणी बैठकीच्या वेळी सदस्यांना उपलब्ध करुन दिली होती. प्रकल्पाचा अहवाल प्रस्तुत करताना मुख्य अभियंता यांनी उरलेल्या कामांचीही माहिती दिली. त्यानंतर प्राधिकरणाने स्थिती अहवालाची नोंद घेतली.

बाब क्र.९ : सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज या संस्थेस शासनाने नेमून दिलेल्या भूखंडाबाबत संस्थेने द्यावयाचा मार्गीकरणाचा खर्च-प्रदानात सूट..

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचार करुन असे मत व्यक्त केले की, वांद्रे-कुर्ला संकुलात शाळा, रुग्णालये इत्यादी चालविण्यासाठी आणि गरीबांच्या व अपंगाच्या कल्याण इत्यादींसाठी फार थोड्या सामाजि संस्थांना भूखंड नेमून देण्यात आले आहेत ही गोष्ट विचारात घेता, अशा संस्थाकडून मार्गीकरणाचा खर्च प्रति चौ. मी. रु. १००/- या दराने सुलभ हप्त्यांत वसूल करण्यात यावा. [हा दर निवासी वापर-दारासाठी निश्चित केलेल्या दराच्या ५० टक्के आहे. ]

तदनुसार प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. ५४६ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरणाच्या ५ ऑगस्ट, १९९१ च्या ठराव क्र. ४५८ मध्ये अंशत: फेरबदल करुन आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम १२, पोटकलम [१] या खंड [एल] आणि कलम २६ चे पोटकलम [१] अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण शाळा, रुग्णालये इत्यादी चालविणा-या व गरीब, अपंग इत्यादींच्या कल्याणाचे काम करणा-या सामाजिक संस्थांकडून प्रति चौ. मी. रु. १००/- म्हणजे निवासी उपयोगासाठी निश्चित केलेल्या मार्गीकरण दराच्या ५० टक्के प्रमाणे मार्गीकरणाचा खर्च वसूल करण्यास याद्वारे मान्यता देत आहे. आणि अशा प्रदानासाठी अशा संस्थांना योग्य ते हप्ते बांधून देण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृतही करण्यात येत आहे."

१५५१



बाब क्र.१० : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील जमिनीचे कापड घाऊक बाजारासाठी वितरण..

या बाबीवर विचारविमर्श करण्याचे पुन: लांबणीवर टाकण्यात आले.

बाब क्र.११ : बॅक-बे रेक्लमेशन एरिया ब्लॉक्स ३ ते ६ बाबत नियोजन समितीचा अहवाल प्राधिकरणास सादर करण्यास मुदतवाढ..

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव संमत करून पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.५४७ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण याव्दारे, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम २८[३] च्या तरतुदींनुसार २९ ऑगस्ट, १९९१ पर्यन्त मुदत वाढविण्यास आणि नियोजन समितीचा अहवाल प्राधिकरणास, प्रस्तावित केल्याप्रमाणे, २९ ऑगस्ट, १९९१ रोजी किंवा तत्पूर्वी सादर करण्यास कार्योत्तर मंजुरी देत आहे."

बाब क्र.१२ : वरळी-वांद्रे जोडमार्ग प्रकल्पाच्या शक्यता अभ्यासासंबंधीच्या अंतिम अहवालाचा कार्यकारी सारांश...

श्री. एस. एस. चक्रवर्ती, व्यवस्थापकीय संचालक, कन्सल्टिंग इंजिनियरिंग सर्विसेस [इंडिया] प्रा. लि. यांनी स्लाईड्सच्या सहाय्याने प्राधिकरणास या प्रकल्पाच्या शक्यता अभ्यासाचा कार्यकारी सारांश सादर केला.

प्राधिकरणाने बाब टिप्पणीच्या मजकुराची नोंद घेतली.

बाब क्र.१३ : स.नं.१७४, हि.नं.१ व ६ पैकी कोले कल्याण, ता. अंधेरी, मुंबई उपनगर जिल्हा येथील २०'x२०' या भूखंड कालिना कुटीर उद्योग संस्थेच्या सभासदांना निवासी विद्युत पुरवठा करण्यासाठी मुंबई उपनगर विद्युत पुरवठा लि. यांना विद्युत पुरवठा उपकेंद्र देण्याबाबत...

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचार करून असे मत व्यक्त केले की, वीज उप-ग्रहण केंद्रासाठी या वस्तीत जमिनीचा लहान तुकडा आवश्यक आहे. ही गरज भागविली पाहिजे. तथापि ज्या अनधिकृत रहिवाशांविरुध्द बृहन्मुंबई महानगरपालिकेने कायदेशीर कार्यवाही सुरु केली आहे त्यांना वीज कनेक्शन्स न देण्याबद्दल बीएसईएस कंपनीला कळविण्यात यावे. वरीलप्रमाणे वीज उपग्रहण केंद्रासाठी योग्य जमीन देण्याबद्दल सोपविलेल्या अधिकारांचा वापर करण्यास प्राधिकरणाने महानगर आयुक्तांना प्राधिकृत केले.

बाब क्र. १४ : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "ई" ब्लॉकमधील मंजूर विकास आराखडयाप्रमाणे बागेसाठी आखून ठेवलेली १५२८० चौ. मी. जमीन नेमून देणे..

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचार करून असे मत व्यक्त केले की, संदर्भाधीन बगिचाचा भूखंड विकसित करण्यासाठी महानगर आयुक्तांनी वाटाघाटी करून कोणत्याही सार्वजनिक क्षेत्र उपक्रमास किंवा खाजगी संस्थेस राजी करू शकतील व तसे शक्य झाल्यास त्या संबंधातील प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी प्राधिकरणापुढे ठेवण्यात यावा. प्राधिकरणाने असेही मत व्यक्त केले की, जर अशी कोणतीही संस्था आढळली नाही तर महानगर आयुक्तांनी बगिचा तयार करण्याचे काम खात्यातर्गत हाती घ्यावे व त्याची देखभाल करावी.

त्यानंतर अध्यक्षांचे आभार मानून सभेचे कामकाज समाप्त झाले.

--

# MINUTES OF THE 67TH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY.

| | | |
|---|---|---|
| DATE | : | 25th November, 1992 (Wednesday) |
| TIME | : | 10.30 A.M. |
| PLACE | : | Committee Room (Room No.313) in the Office of Hon'ble Minister for Urban Development, Mantralaya. |

MEMBERS PRESENT :

| | |
|---|---|
| Shri Jawaharlal Darda, Minister for Urban Development. | - Chairman |
| Prof.Javed Khan, Minister for Housing. | - Member |
| Shri Ranjit Deshmukh, Minister of State for Urban Development. | - Member |
| Shri R.T. Kadam, Chairman, Standing Committee, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri R.R. Singh, Councillor, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri Subhash Mayekar, Councillor, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri Prabhakar N. Dharkar, M.L.C. | - Member |
| Shri D.T. Joseph, Secretary (I) to the Govt. of Maharashtra, Urban Development Department. | - Member |
| Shri Navin Kumar, Secretary to Government, Housing & Special Assistance Department. | - Member |
| Shri P. Subrahmanyam, Metropolitan Commissioner, B.M.R.D.A. | - Member-Secretary |

INVITEE :

Shri G.B. Pingulkar,
Secretary (II) to Government,
Urban Development Department.

At the outset, the members cordially welcomed Shri Jawaharlal Darda who was attending the meeting of the Authority for the first time as its Chairman after his appointment as Minister for Urban Development.

The Chairman then cordially welcomed Shri Ranjit Deshmukh, Minister of State for Urban Development who was a new member of the Authority.

The Chairman thereafter placed on record the valuable services rendered by Shri Vasant Chavan, former Minister for Urban Development, as the Chairman of the Authority and by Shri Madan Bafna, former Minister of State for Urban Development, as a member of the Authority.

The items on the agenda were then taken up for consideration.

ITEM NO.1 : Confirmation of the Minutes of the last (66th) Meeting of the Authority.

The minutes were confirmed.

ITEM NO.2 : Action taken on the Minutes of the last (66th) Meeting of the Authority.

After discussion on the item regarding grant of additional F.S.I. to building on CTS No.A-791 of Bandra Reclamation, in 'A' Block of Bandra-Kurla Complex for Leelavati Kirtilal Mehta Medical Trust (viz. Item No.12 of 66th Meeting), the action taken report was noted by the Authority.

ITEM NO.3 : Development of Truck-Terminal, Wadala approval to the Block estimate for infrastructural works in Phase-II, Truck Terminal, Wadala.

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO. 544 :

"RESOLVED that the Authority hereby gives the Administrative approval to the block estimate for the infrastructural work in Phase-II of Truck Terminal, Wadala amounting to Rs. 2790 lakhs, as detailed in Annexure to the Item Note, as proposed.

.......3/-

"RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to take further actions to develop the infrastructural works in Phase-II of Truck Terminal, Wadala and incur expenditure on items as and when required."

ITEM NO.4 : Disposal of balance plots in Phase-I of Wadala Truck Terminal to Bombay Goods Transport Association and Maharashtra Rajya Truck, Tempo, Tankers, Bus Vahatuk Mahasangh.

After discussion, **further consideration of the Item was deferred.**

ITEM NO.5 : Allotment of land in 'G' Block of the Bandra-Kurla Complex to NABARD.

While placing the item before the Authority, the Metropolitan Commissioner informed the meeting that the Authority at its 65th Meeting, held on 11th August, 1992 had allotted 2 plots in 'G' Block of Bandra-Kurla Complex to two financial Institutions viz., the Industrial Credit & Investment Corporation of India Limited (ICICI) and the National Bank for Agricultural and Rural Development (NABARD) vide Resolution Nos.528 and 529, respectively. The ICICI was allotted land admeasuring about 30,000 sq.mtrs. and the NABARD was allotted land of about 23,235 sq.mtrs. The NABARD accepted the offer and also requested to allot them additional land of 9293 Sq.Mtrs. making total plot of land of 32,528 sq.mtrs. Taking into consideration that the ICICI was allotted plot of land admeasuring about 30,000 sq.mtrs. the Authority felt that NABARD should also be allotted plot of about 30,000 sq.mtrs. only. The Authority accordingly passed the following Resolution :-

RESOLUTION NO.545 :

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred on it under sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974, read with Regulation No.4(iii) of the BMRDA (Disposal of Lands) Regulations, 1977, (hereinafter referred to as "the said Regulations") and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby approves the proposal to allot additional land in 'G' Block, B.K.C., to NABARD,

.......4/-

so as to have additional built-up area of about 6765 sq.mtrs. (making the total area of the entire plot allotted about 30,000 sq.mtrs.), on 80 years lease from the date of execution of the Agreement to Lease in Form 'D' of the said Regulations, subject to the following terms and conditions :

(1) That the lease premium will be Rs.15,000/- per FSI Sq.Mtr.

(2.) That the NABARD will pay the lease premium in relaxation of the Regulations 9 of the said Regulation in the following manner in respect of the additional land under reference :-

(a) 40% of the lease premium within one month from the date of the acceptance of the offer;

(b) 35% of the lease premium within six months from the date of the acceptance of the offer; and

(c) the remaining 25% of the lease premium within six months from the date mentioned at (b) above.

(3) That the offer is subject to "the said Regulations."

"RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to implement the Resolution and make suitable changes in the Form of Agreement to Lease in Form 'D' and Lease Deed in Form 'E', as may be required."

ITEM NO.6 : Allotment of land admeasuring 5000 sq.mtrs. in 'G' Block of Bandra-Kurla Complex to the Association of the Chartered Accountants for constructing office building.

Consideration of the Item was again deferred.

ITEM NO.7 : Aproval to enter into Tripartite Agreement among the State Government, BMRDA and the Land holders viz. M/s. Mukand Iron & Steel Works Ltd. (now renamed as Mukand Ltd.) in respect of their land at Powai.

Consideration of the Item was deferred.

ITEM NO.8 : Status Report of Channelisation work in the Bandra-Kurla Complex.

Note containing detailed Status Report of Channelisation work in the Bandra-Kurla Complex was circulated to the members at the time of meeting. While presenting the report the

Chief Engineer also explained various remaining works. Status Report was then noted by the Authority.

ITEM NO.9 : Channelisation Charges to be paid by the Centre for the Study of Social Change, in respect of plot allotted to it by the Government - Exemption in payment.

The Authority considered the Item Note and was of the view that taking into consideration the fact that very few social institutions have been allotted plots in Bandra-Kurla Complex for running schools, hospitals, etc. and for the welfare of the poor, the physically handicapped, etc. the Channelisation Charges shall be recovered in easy instalments from such institutions @ Rs.100/- per sq.mtr. which is 50% of the rate fixed for residential user.

The Authority accordingly passed the following Resolution :-

RESOLUTION NO. 546 :

"RESOLVED THAT in partial modification of Authority's Resolution No.458, dated 5th August, 1991 and in exercise of the powers conferred under clause (1) of sub-section (1) of Section 12 of the BMRDA Act, 1974 read with sub-section (1) of Section 26 of the Act, the Authority hereby approves that the Channelisation Charges shall be recovered from the social institutions running schools, hospitals, etc. and those for the welfare of the poor, the physically handi-capped, etc.@ Rs.100/- per sq.mtr. being 50% of the rate of channelisation fixed for residential user and the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to fix suitable instalments for payment of such charges by such institutions."

ITEM NO.10 : Allotment of land for Wholesale Textile Market in 'G' Block of Bandra-Kurla Complex.

Consideration of the Item was again deferred.

**ITEM NO.11 :** Extension of time limit to submit Planning Committee's Report for BBRS Blocks III to VI to the Authority.

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :-

**RESOLUTION NO. 547 :**

"RESOLVED THAT the Authority hereby accords post-facto sanction under provisions of Section 28(3) of MR&TP Act, 1966 to extend time limit upto 29th August, 1991 and to submit Planning Committee's Report to the Authority on or before 29th August, 1991, as proposed."

**ITEM NO.12 :** Worli-Bandra Link Project - Executive Summary of the final Report regarding Feasibility Study of -

Shri S.S. Chakravarty, Managing Director, Consulting Engineering Services (India) Pvt. Ltd., presented the Executive Summary of the Feasibility Study of the Project to the Authority with the aid of slides.

The Authority noted the contents of the Item Note.

**ITEM NO.13 :** Allotment of land admeasuring 20' x 20' in Survey No.174, Hissa No.6 pt. of 1 pt. of Village Kole Kalyan, Taluka Andheri, District Bombay Suburban, to Bombay Suburban Electric Supply Limited, for erecting Sub-Station for supplying electricity to the residents of Kalina Kutir Udyog Society.

The Authority considered the Item Note and was of the view that the need of the locality to have a small piece of land for Electric Sub-Station would have to be met and that the BSES Ltd. should, however, be informed not to grant electricity connections to the unauthorised occupants against whom the Municipal Corporation of Greater Bombay have launched legal proceedings. The Authority accordingly authorised the Metropolitan Commissioner to exercise the powers delegated to him for grant of suitable land for Electric Sub-Station.

......7/-

ITEM NO.14 : Allotment of land admeasuring 15280 sq.mtrs. in 'E' Block of the Bandra-Kurla Complex, reserved for Garden as per sanctioned planning proposals, etc.

The Authority considered the proposal contained in the Item Note and was of the view that if the Metropolitan Commissioner could persuade by negotiation any Public Sector Undertaking or Private Organisation to develop garden plot under reference, proposal in that respect be placed before the Authority for its final approval. The Authority was also of the view that in case no such institution is found, the Metropolitan Commissioner may take-up the work of development of the garden and maintain the same departmentally.

The meeting then concluded with a vote of thanks to the Chair.

-.-.-.-.-.-.-.-